सातारा तालुका पो.स्टे. फोन नं. ०२१६२/२३८६०७
ईमेल :- sataratps.satara@mahapolice.gov.in

---000---

प्रेसनोट ता. ३१/१०/२०२२

**दिनांक २७/१०/२०२२ रोजीचे रात्री ०८.०० ते दिनांक २८/१०/२०२२ रोजीचे पहाटे ०५.०० वा.चे दरम्यान लिंब येथील रेवडीकर आण्णा महाराज व विठ्ठल रुखुमाई मंदीरातील चोरी करणा-या चोरटयांना पोलीसांकडुन अटक ..... सातारा तालुका पोलीसांची कारवाई....**

---000---

दिनांक २७/१०/२०२२२ रोजी रात्री ०८.०० ते दिनांक २८/१०/२०२२ रोजीचे पहाटे ०५.०० वा.चे दरम्यान मौजे लिंब ता.जि.सातारा गावचे हद्दीतील ब्रम्हचैतन्य सद्गुरू रेवडीकर आण्णा महाराज व विठ्ठल रखुमाई मंदीराचे व समाधीचे दोन्ही दरवाजांचे कुलुपे तोडुन मंदीरातील दान पेटीचे कुलुप तोडुन त्यातील रोख रक्कम व इतर साहीत्य कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेलेबाबत अर्जुन बालबा सरगर रा.लिंब ता.जि.सातारा यांनी दिले तक्रारी वरुन सातारा तालुका पोलीस ठाणेस गु.र.नं. ४३९/२०२२ भा.द.वि.स. कलम ३७९ प्रमाणे दिनांक २९/१०/२०२२ रोजी गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयाचा तपास मा.पोलीस अधिक्षक,सो समीर शेख, मा.अपर पोलीस अधीक्षक,सो अजित बो-हडे व मा.उपविभागीय पोलीस अधिकारी आंचल दलाल सो सातारा विभाग सातारा यांचे मार्गदर्शन खाली व पोलीस निरीक्षक श्री.विश्वजित घोडके सातारा तालुका पोलीस ठाणे यांचे सुचनां प्रमाणे सहाय्यक पोलीस फौजदार, श्री.आयाज बागवान, पोलीस नाईक नितीराज थोरात, पोलीस शिपाई सतिश पवार व पोलीस शिपाई गजानन फडतरे सातारा तालुका पोलीस ठाणे यांनी करुन सदरचा गुन्हा घडले ठिकाणावरील तसेच आजुबाजुचे परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी करुन नमुद सीसीटीव्ही फुटेज मधील संशयित इसमांची माहिती प्राप्त करुन सदर इसमास ताब्यात घेऊन त्याचेकडे विचारपुस करुन सदरचा गुन्हा उघकीस आणला आहे व सदर गुन्हयाचे तपासामध्ये आरोपीला अटक करण्यात आली असुन अटक आरोपी कडुन गुन्हयातील चोरीस गेला माल हस्तगत केला आहे.अटक आरोपीस सातारा तालुका पोलीसांनी अटक करुन त्यास मा. न्यायालयात हजर केले असता त्याची दिनांक ३१/१०/२०२२ रोजी पर्यत पोलीस कोठडी मंजुर केली आहे व आरोपीस आज दिनांक ३१/१०/२०२२ रोजी मा.न्यायालयात हजर केले असता मा.न्यायालयाने त्याची न्यायालयीन कोठडी मंजुर केली आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक सो, समीर शेख, अप्पर पोलीस अधिक्षक अजित बो-हाडे, मा.सहा. पोलीस अधिक्षक ऑचल दलाल यांचे मार्गदर्शन खाली व मा. विश्वजित घोडके, पोलीस निरीक्षक यांचे सुचने प्रमाणे तसेच सहा.पो.फौजदार आयाज बागवान, पोलीस नाईक नितीराज थोरात, पोलीस शिपाई सतिश पवार व पोलीस शिपाई गजानन फडतरे सातारा तालुका पोलीस ठाणे यांनी केलेली आहे.

सर्व वृत्तसंपादक,

Scanned with CamScanner



